# प्रेसनोट

दि.०५/०७/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | राहाता पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | विकास सूर्यभान दुशिंग, वय–५१ वर्ष, धंदा–नोकरी, भूमी अभिलेखपाल, वर्ग–३, भूमी अभिलेख कार्यालय, राहाता, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २५,०००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी सन २०१७ मध्ये बाभळेश्वर बुद्रुक, ता.राहाता, जि.अहमंदनगर येथील गट क्रमांक व उपविभाग ६५ मध्ये १ हेक्टर ५२ आर शेती क्षेत्र विकत घेतले होते, सदर क्षेत्राची तक्रारदार यांनी खाजगी मोजणी केली असता ३२ गुंठे क्षेत्र कमी भरले होते, त्यामुळे तक्रारदार यांनी सदर क्षेत्राची मोजणी होणेकरीता २०२२ मध्ये मा.दिवाणी न्यायालय, राहाता येथे अर्ज केला होता, त्यानुसार मा.दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा क्र.१५१/२०२२ चालू होता. सदर दाव्यामध्ये मा.न्यायालयाने दि.४/२/२०२३ रोजीच्या आदेशात उप अधीक्षक, भूमी अभिलेख, राहाता यांना सदर जमिनीचा नकाशा व रिपोर्ट दि.१०/३/२०२३ पावेतो सादर करण्यास आदेशीत केले होते. त्यानुसार तक्रारदार यांनी वेळोवेळी भूमी अभिलेख कार्यालय राहाता येथे जाऊन यातील आरोपी लोकसेवक विकास सूर्यभान दुशिंग, भूमी अभिलेखपाल, वर्ग–३, भूमी अभिलेख कार्यालय, राहाता, जि.अहमदनगर यांना नकाशा व रिपोर्ट तयार करुन मा.न्यायालयात लवकर सादर करा याबाबत विनंती केली होती. दि.२०/६/२०२३ रोजी यातील आरोपी लोकसेवक दुशिंग यांनी नकाशा व रिपोर्ट तयार केला होता परंतु कोर्टात पाठविला नव्हता, म्हणुन यातील तक्रारदार यांनी दि.२/७/२०२३ रोजी यातील आरोपी लोकसेवक दुशिंग यांना भेटुन नकाशा व रिपोर्ट मा.न्यायालयात पाठविण्याची विनंती केली असता आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या बाजूने नकाशा व रिपोर्ट मा.न्यायालयात सादर करण्यासाठी २५,०००/– रुपयांची लाच मागणी केली बाबतची तक्रार आज दि.५/७/२०२३ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुसार आज दि.५/७/२०२३ रोजी भूमी अभिलेख कार्यालय, राहाता येथे लाच मागणी पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक दुशिंग यांनी तक्रारदार यांचेकडे मा.न्यायालयात रिपोर्ट सादर करण्यासाठी पंचासमक्ष २५,०००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज दि.५/७/२०२३ रोजी भूमी अभिलेख कार्यालय, राहाता येथे सापळा आयोजित केला असता यातील आरोपी लोकसेवक दुशिंग यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष २५,०००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत आरोपी लोकसेवक दुशिंग यांचेविरुध्द राहाता पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर